# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**2 JULY, 2018**

[Time : 14-00]

**MARATHI SHORTHAND**

(120 Words Per Minute)

Marks : 100

**(Time allowed for Transcription of (A) and (B) passages : 2 Hr. and 30 Min.)**

**मराठी लघुलेखन**

[१२० शब्द प्रति मिनिट]

गुण : १००

**[कालावधी – [अ] आणि [ब] उताऱ्यांचे लिप्यांतर करण्यासाठी २ तास व ३० मिनिट]**

---

**[अ]** **[गुण : ४५ + ५ संकेताकृतींसाठी]**

महाशय,

आम्ही खत कारखाना काढला त्याला आज २० वर्षे पुरी होत आहेत. व आमच्या खेरीज आणखी दोन - तीन कारखाने निघाले आहेत, तरीही अजून खताची मागणी पुरी / होऊ शकत नाही. ही गोष्ट लक्षात घेऊन आम्ही यंत्राच्या साहाय्याने चरबीपासून नवीन प्रकारचे खत तयार करण्यासाठी मशीनरी मागविली आहे, आणि प्रत्यक्ष कामाला // सुरुवातही झाली आहे. दर वर्षी सत्तर हजार टन खत तयार होईल असा अंदाज आहे. आमच्या ह्या नवीन उत्पादनासाठी आम्हाला संबंध भारतभर एजंट नेमावयाचे आहेत. /// ह्या कामासाठी आपण सर्व दृष्टींनी लायक आहात अशी खात्रीची माहिती आम्हास मिळाल्यावरुन आम्ही आपणास हे पत्र लिहीत आहोत.

आपला देश अन्नधान्याच्या बाबतीत //१// पुष्कळसा स्वावलंबी झाला असला तरी शेतीचे उत्पादन जास्तीत जास्त वाढवण्याच्या दृष्टीने उत्तम खतांचे महत्त्व नाकारता येत नाही. त्या दृष्टीने निनिराळ्या खतांची मागणी / दिवसंदिवस वाढत्या प्रमाणावर आहे. म्हणून आम्ही उपरोक्त उपक्रम हाती घेतला आहे. आमच्या कारखान्यास सरकाराची मंजुरी मिळवण्यात आम्ही यश संपादन केले आहे. नुकतेच अधिकाऱ्यांनी // आमच्या कारखान्यास भेट देऊन गेले आणि त्यांना आमच्या उपक्रमांची प्रशंसा करुन कारखान्याच्या यशस्वितेसाठी आवश्यक ते सर्व सहाय्य व सहकार्य देण्याचे मोठ्या आनंदाने मान्य केले /// आहे. आपणही सवड काढून आमच्या कारखान्याची पाहणी केल्यास आम्हास आनंदच होईल. भेटीच्या वेळी आपण काही सूचना केल्यास त्यांचा आम्ही अवश्य विचार करू आणि //२// शक्य तर अंमलातही आणू एजन्सीकरीता काही व्यक्ती आम्हाला भेटून व वाटाघाटी करुन गेल्या आहेत. परंतु या क्षेत्रातील आपला अनुभव लौकीक व संघटना कौशल्य लक्षात घेता आमच्या / वरील कारखान्यातर्फे तयार होणाऱ्या मालाची एजन्सी आपणाकडेच सोपवणे आम्हाला आवडेल शेती उत्पादनाच्या क्षेत्रात खतांचे महत्त्व लक्षात घेऊन इतरही काही

खत कारखाने // सुरु होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे या क्षेत्रातील व्यापारी स्पर्धा दिवसेदिवस वाढीस लागणार यात शंका नाही. आपण आमच्या मालाची एजन्सी स्वीकारण्यास संमती दिल्यास /// त्याबाबतीत आम्हास अगदी निर्धास्त राहता येईल.

देशाच्या शेतीच्या उत्पादनवाढीच्या दृष्टीने व देशाच्या संपत्तीत भर घालण्याच्या दृष्टीने काही केले //३// जात नाही. ही गोष्ट लक्षात घेऊन आम्ही हा उपक्रम हाती घेतला आहे. आमच्या या उपक्रमामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ करण्यास पुष्कळच मदत होईल / अशी आम्हास आशा वाटते. आपण गेली कित्येक वर्षे शेंणखत व इतर सुधारलेल्या खतांचा व्यापार करीत आहात. त्यामुळे आमची एजन्सी घेण्यास आपणास आनंद वाटेल // अशी आमची कल्पना आहे. आमच्या प्रस्तावानुसार आपण एजन्सी घेण्यास तयार असला तर तसे आम्हास उलट टपाली कळवावे. आपणाकडून होकारार्थी उत्तर आल्यानंतर एजन्सीच्या अटी /// व शर्ती वगैरे तपशील ठरविता येईल. याकरिता तुम्हाला पुन्हा स्वतंत्र पत्रव्यवहार करून कळविले जाईल. त्यासाठी आमचे स्वतंत्र पथक आपल्या भेटीस येईल तेव्हा ठरवू.

कळावे,

आपले विश्वासू //४//

**[दोन मिनिटांचे मध्यांतर]**

---

[ब] **[गुण : ४५ + ५ संकेताकृतींसाठी]**

या देशामध्ये काही वर्षांपूर्वी जे होण्याची आवश्यकता होती ते काम आम्हाला आता करावे लागत आहे. नदयांना धरणे बांधावयाला आजपर्यंत थांबावयाला हवे होते, असे / मुळीच नाही. ती याच्या पूर्वीच बांधली असती तर फार बरे झाले असते. आज काही बाबतीत आम्ही पुढे गेलो आहोत पण ही साधी प्राथमिक गोष्ट राहून गेली आहे. पावसाचे // पाणी अडवून धरले पाहिजे ही किती सामान्य गोष्ट आहे. देशाची संपत्ती कोठे आहे ? देशांची संपत्ती सरकारच्या खजिन्यात नाही, श्रीमंताच्या बँकबुकातही ती नाही. देशाची /// संपत्ती जी आहे ती परमेश्वराने सृष्टीने व निर्सगाने देशाला दिलेली आहे. आपल्याकडे जी नैसर्गिक साधने आहेत त्या साधनांमध्ये देशाची संपत्ती साठविलेली आहे. //१// हा विचार यापूर्वी आमच्या देशामध्ये उत्कटतेने व तीव्रतेने कधी कोणाच्या मनात आला नव्हता आणि त्याचा वापरही केला गेला नव्हता. आज तो विचार प्रथम / आलेला आहे.

आपल्या देशामध्ये एका एकरामध्ये पाच मण धान्य यावे आणि रशियामध्ये मात्र एकाच एकरात पंचवीस मण धान्य यावे याचे कारण काय ? रशियन // माणसाला परमेश्वराने जास्त अक्कल दिली आहे. आणि आपल्या माणसाला काय कमी दिली आहे ? रशियन लोकांनी त्यांना निसर्गाने दिलेल्या साधनांचा जास्त चांगला उपयोग केला /// आम्ही तो केला नाही असा त्यातला खरा प्रकार आहे तुमच्या आमच्या देशामध्ये नदयांना किती महत्त्व आहे हे सांगावयाला नको. वर्धा जिल्ह्याचे नांव वर्धा काय, आणि //२// तुमच्या गावाचे नांव वर्धा काय, नदी वाहते म्हणून वर्धा. दूसरे काही कारण मला तरी दिसत नाही. अनेक मुलुखांची नावे नदयांमुळेच पडली आहेत नद्या हेच आमचे जीवन / आहे. आपण सर्व नदयांना लोकमाता म्हणतो. या लोकमाता नसत्या तर लोक कोठे राहीले असते कोण जाणे.

नदयांत नवजीवन देण्याची जी शक्ती आहे त्यातुन आमचे // जीवन निर्माण झाले आहे. पंजाबला पंजाब का म्हणतात माहीत आहे ? पाच नदयांचा मुलूख म्हणून पंजाब आमचे सर्व जीवन नदयांमध्ये साठविलेले आहे. पाण्याला जीवन म्हणतात /// या जीवनाकडे आजपर्यंत आपण दुर्लक्ष केले ही पहिली मोठी चूक या देशामध्ये झाली आहे. आज आम्ही जागे झालेलो आहोत. आज प्रत्येक गावात गेल्यानंतर सांगतात //३// की पाहा आमच्या गावाशेजारुन एक नदी वाहात आहे. जणू काही नदी वाहात असल्याचा आजपर्यंत पत्ताच नव्हत. आता लोकांना जाणीव झाली आहे की या देशामध्ये / पावसाचे पाणी पडते आणि नदयांतून वाहून जाते ते थांबविले पाहिजे. आम्ही यापूर्वी जी चूक केली ती आता दुरुस्त करावयाला लागलो आहोत. निसर्गाने दिलेल्या या // पाण्याचा उपयोग लोकांचे जीवन समृद्ध करण्याकडे आम्ही आजवर प्रयत्न कधी केलाच नाही. परंतु आज आमच्या लक्षात आल्यावर नदयांचा धरणाच्या कामांची /// चढाओढ लागलेली आहे.

त्यामुळे सगळा भारत देश ज्यावेळी पाऊस नसेल तेव्हा याचा पुरेपुर वापर केला जाईल अनेक संस्था या कामासाठी पुढे पुढे येत आहेत. //४//

---